# MahaDBT वेबसाईटवर विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी आवश्यक सूचना

विद्यार्थ्यांनी त्यांना पात्र असणाऱ्या योजनेसाठी अर्ज करावेत. चुकीच्या योजनेसाठी अर्ज भरला तर तो अर्ज सादर करताना सादर / मंजूर होत नाही. विद्यार्थ्यांसाठी पात्र असलेल्या स्कीम पुढील प्रमाणे

**१. RAJARSHI CHHATRAPATI SHAHU MAHARAJ SHIKSHAN SHULK SHISHYAVRUTTI YOJNA**

OPEN Category चे विद्यार्थी (ज्यांचे उत्पन्न ६ लाख पेक्षा कमी आहे ) त्यांनी या स्कीमला सिलेक्ट करून अर्ज करावा.

**२. DR. PUNJABRAO DESHMUKH VASTIGRUH NIRVAH BHATTA YOJNA**

OPEN Category चे विद्यार्थी ज्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत असे त्यांनी या स्कीमला सिलेक्ट करून अर्ज करावा.

**३. GOVERNMENT OF INDIA POST-MATRIC SCHOLARSHIP**

(SC/ST Category चे विद्यार्थी ज्यांचे उत्पन्न २ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे ते व OBC/SBC/VJ NT Category चे विद्यार्थी ज्यांचे उत्पन्न १ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे असे फक्त त्यांनीच या योजनेसाठी अर्ज करावा.)

**४. POST-MATRIC TUITION FEE AND EXAMINATION FEE**

(SC/ST Category चे विद्यार्थी ज्यांचे उत्पन्न २ लाख पेक्षा जास्त आहे ते व OBC/SBC/VJ NT Category चे विद्यार्थी ज्यांचे उत्पन्न १ लाख किंवा त्यापेक्षा जास्त परंतु ६ लाख पेक्षा कमी आहे असे फक्त त्यांनीच या योजनेसाठी अर्ज करावा.)

**५. Scholarship Scheme For Students of Minority Communities Pursuing Higher & Professional Education**

राज्य शासनाच्या अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजनेसाठी अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी हि स्कीम सिलेक्ट करून अर्ज करावा.

आपल्या महाविद्यालयात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रामुख्याने वरील ४ योजना लागू आहेत. तरी विद्यार्थ्यांनी योग्य त्या योजनेसाठी अर्ज करावा. विद्यार्थ्यांना अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास त्यांनी suyash.raut@mescoepune.org या ईमेल आयडी वर मेल करावा किंवा महाविद्यालयास संपर्क करावा.

# विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना पुढील मार्गदर्शक सूचनांचा वापर करावा

## 1. Personal Details




1. हा नूतनीकरण अर्ज आहे? :- मागील वर्षी योजनेचा लाभ घेतला असेल तर हो सिलेक्ट करावे अन्यथा नाही सिलेक्ट करावे
2. अर्ज क्रमांक :- ( SE / TE /BE मधील विद्यार्थ्यांनी जर मागील वर्षी योजनेचा लाभ घेतला असेल तर मागील वर्षीचा अर्ज क्रमांक भरावा. मागील वर्षीचे अर्ज क्रमांक महाविद्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत)
3. तुम्ही महाराष्ट्राचे आश्रयस्थान आहात का :- होय असे सिलेक्ट करावे. नाही सिलेक्ट करू नका
4. आपल्याकडे निवासस्थान प्रमाणपत्र आहे (स्वयं / पालक) :- होय असे सिलेक्ट करावे. नाही सिलेक्ट करू नका
5. अधिवास / रहिवाशी प्रमाणपत्र क्रमांक :- अधिवास प्रमाणपत्राचा क्रमांक नमूद करावा.
6. अधिकारी :- अधिवास प्रमाणपत्र प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम सिलेक्ट करावे
7. दाखला / प्रमाणपत्र मिळाल्याचे दिनांक :- अधिवास प्रमाणपत्र दिनांक सिलेक्ट करावी
8. Choose File :- येथे अधिवास प्रमाणपत्र सॉफ्ट कॉपी सिलेक्ट करून अपलोड करावे

## 2. Income Details.




1. आपल्याकडे कौटुंबिक उत्पन्न प्रमाणपत्र आहे :- होय असे सिलेक्ट करावे. नाही सिलेक्ट करू नका
2. आपल्याकडे प्रमाणपत्रावर बारकोड आहे :- बारकोड असल्यास होय सिलेक्ट करावे अन्यथा नाही सिलेक्ट करावे.
3. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न :- येथे उत्पन्न प्रमाणपत्रावर असलेले उत्पन्न अचूक भरावे.
4. उत्पन्न दाखला / प्रमाणपत्र क्रमांक :- उत्पन्न प्रमाणपत्रावर नमूद असलेला प्रमाणपत्र क्रमांक भरावा.
5. अधिकारी :- उत्पन्न प्रमाणपत्र प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम सिलेक्ट करावे
6. दाखला / प्रमाणपत्र मिळाल्याचे दिनांक :- उत्पन्न प्रमाणपत्र मिळाल्याची दिनांक सिलेक्ट करावी
7. Choose File :- येथे उत्पन्न प्रमाणपत्र सॉफ्ट कॉपी सिलेक्ट करून अपलोड करावे

## 3. Personal Eligibility Details




1. आपण वेतनधारक आहात का :- आपण वेतनधारक असाल तर होय, नसेल तर नाही असे सिलेक्ट करावे

2. अपंगत्व आहे का :- अपंगत्व असाल तर होय, नसेल तर नाही असे सिलेक्ट करावे

3. मुलांची संख्या :- येथे विद्यार्थ्यांचा अपत्य क्रमांक नमूद करावा.

4. रेशन कार्ड Choose File :- या ठिकाणी आपले कुटुंबाचे रेशनकार्ड ज्यात विद्यार्थीचे नाव नमूद आहे ते सॉफ्टकॉपि अपलोड करावे (शक्यतो रेशनकार्डाचे मागील व पुढील पाने एकाच फाईल मध्ये स्कॅन करावे)

# अत्यंत महत्वाचे

## 4. Course Detail.




1. महाविद्यालयामधील प्रवेश वर्ष :- प्रथमवर्ष / थेट व्दितीय वर्ष प्रवेशाचे वर्ष सिलेक्ट करावे

2. चालू कोर्स – जिल्हा :- ज्या जिल्हयामध्ये विद्यार्थी सध्या शिकत आहे त्या जिल्हयाचे नाव सिलेक्ट करावे

3. चालू कोर्स – तालुका :- ज्या तालुकामध्ये विद्यार्थी सध्या शिकत आहे त्या तालुकाचे नाव सिलेक्ट करावे

4. चालू कोर्स - महाविद्यालयाचे नाव :- ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे त्याचे नाव सिलेक्ट करावे

**MODERN EDUCATION SOCIETYS COLLEGE OF ENGINEERING, PUNE**

5. अभ्यासक्रमाचे नाव :- विद्यार्थी सध्या ज्या अभ्यासक्रमात शिकत आहे त्याचे नाव सिलेक्ट करावे.

6 चालू कोर्स - प्रकार अनुदान :- अभ्यासक्रमाचा मान्यता प्रकार सिलेक्ट करावा. (**Non Granted** सिलेक्ट करावे)

7. चालू शैक्षणिक वर्ष :- विद्यार्थी सध्या ज्या वर्षात आहे ते वर्ष सिलेक्ट करावे. e.g. FE=1,SE=2,TE=3,BE=4

8. चालू कोर्स - प्रवेश दिनांक :- चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याची तारीख सिलेक्ट करावी.

वरील माहिती विद्यार्थ्यांनी बिनचूक भरावी अन्यथा आपला अर्ज पुढील कार्यवाहीसाठी पाठविता येणार नाही महाविद्यालयाचे नाव हे जिथे शिकत आहे तेच सिलेक्ट करावे, अनुदान प्रकार हा NON GRANTED असाच सिलेक्ट करावा.

Created by – Mr. Suyash Raut.